महाराष्ट्र शासन

## सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

# सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सिन्नर, जि. नाशिक

यांचे कार्यालय, 2 रा मजला, व्यापारी सहकारी बँक इमारत,सिन्नर.

e-mail : ar_sinnar@rediff.com

---

जा.क्र. वि.3/गुळवंच विकास/कलम 88/सन 2017. दिनांक : 27/11/2017.

वाचावे :-
1) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 88.
2) गुळवंच विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., शहा ता. सिन्नर जि. नाशिक या संस्थेचा 2015-16 व 2016-17 या कालावधीचा लेखापरिक्षण अहवाल.
3) मा. जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-1, सहकारी संस्था, नाशिक यांचेकडील पत्र जा.क्र.लेप/अफ-प्रशा-अह/गुळवंच विकास/2261/सन 2017, दिनांक 25/10/2017.
4) श्री. पी.जी.वरखेडे, लेखापरिक्षक श्रेणी-1, सहकारी संस्था, सिन्नर यांचेकडील गुळवंच विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., गुळवंच ता. सिन्नर या संस्थेचा दिनांक 01/04/2015 ते 31/03/2017 या कालावधीतील अपहाराबाबतचा विशेष अहवाल.

ज्याअर्थी, गुळवंच विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., गुळवंच ता. सिन्नर ही संस्था (यापुढे जिचा उल्लेख संस्था असा केला आहे) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व त्याखालील नियम 1961 अन्वये नोंदविण्यांत आलेली सहकारी संस्था आहे. आणि,

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व त्याखालील नियम 1961 मधील तरतुदी, संस्थेचे मंजुर उपविधीतील तरतुदीनुसार, तसेच शासन व मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या परिपत्रकीय सूचनांनुसार सदर संस्थेचे कामकाज पार पाडणे संस्थेच्या संचालक मंडळावर व अधिकारी / कर्मचारी वर्गावर बंधनकारक आहे. आणि,

ज्याअर्थी उपरोक्त संस्था ही या कार्यालयाच्या कार्यकक्षेत येत असुन, संस्थेचे दिनांक 01/04/2015 ते 31/03/2017 या कालावधीचे वैधानिक लेखापरिक्षण महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 81 (3) (अ) व 81 (4) अन्वये मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांचेकडील 26/7/2017 अन्वये श्री. पी. जी. वरखेडे, लेखापरिक्षक श्रेणी-1, सहकारी संस्था, सिन्नर यांनी केलेले असुन, लेखापरिक्षण अहवाल 26/09/2017 रोजी सर्व संबंधितांना सादर केलेला असल्याचे नमुद करण्यात आलेले आहे. तसेच सदर लेखापरिक्षण अहवाल कालावधीतील महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 81 (5 ब) अन्वये अफरातफर विशेष अहवाल देखील सादर करणेत आलेला आहे. सदरचा विशेष अहवाल उपरोक्त वाचावे क्रमांक 3 दिनांक 26/9/2017 रोजीच्या पत्रान्वये दिनांक 27/10/2017 रोजी या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. आणि,

ज्याअर्थी सदर संस्थेचे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 81 अन्वये दिनांक 01/04/2015 ते 31/03/2017 या कालावधीचे लेखापरिक्षण पुर्ण करण्यात आलेले असुन लेखापरिक्षण अहवालासोबत प्राप्त झालेला अफरातफर विशेष अहवाल या कार्यालयामार्फत छाननी करण्यात आला. विनिर्दिष्ट अहवालातील एकंदर निष्कर्ष पाहता संस्थेचे सचिव यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व त्याखालील नियम 1961 मधील तरतुदी, संस्यचे मंजूर उपविधीतील तरतुदी शासन व मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या परिपत्रकीय सूचना यानुसार आपली कर्तव्ये व जबाबदारी यांचे पालन केलेले नसल्याने, संस्थेच्या निधीचा दुरुपयोग होवून संस्थेचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झालेले आहे. आणि,

ज्याअर्थी, संस्थेचे वैधानिक लेखापरिक्षणासाठी नियुक्त लेखापरिक्षक यांनी सादर केलेल्या अफरातफर विशेष अहवालात स्वयंस्पष्ट अभिप्राय नमुद करुन कायदेशीर कारवाई करणेची शिफारस केलेली आहे. आणि,

ज्याअर्थी, संस्थेच्या विशेष अहवाल अहवालात नमुद गंभीर दोष व संस्थेच्या झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत संबधितांना जबाबदार धरुन कायदेशीर कारवाई होणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, गुळवंच विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., गुळवंच ता. सिन्नर ... 01/04/2015 ते 31/03/2017 या कालावधीतील लेखापरिक्षणातील विशेष अहवालात नमुद केलेल्या आर्थिक नुकसानीची व्याप्ती निश्चित करुन त्याबाबत रकमांची जबाबदारी निश्चित करणे आणि नुकसानीचे व्यक्तीनिहाय प्रमाण व जबाबदारी निश्चित करणेसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 88 अन्वये कारवाई होणे आवश्यक असल्याने व तशी माझी खात्री झाल्याने, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## -:: <u>आ दे श</u> ::-

मी, अर्चना सौंदाणे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सिन्नर, जि. नाशिक मला महाराष्ट्र शासन, सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्र. सीएसएल-1493/1162/सीआर-47/15-सी, दिनांक 07/08/1993 व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 चे कलम 88 (१) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार **गुळवंच विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., गुळवंच ता. सिन्नर या संस्थेच्या** दिनांक 01/04/2015 ते 31/03/2017 या कालावधीच्या विशेष अहवालात नमुद करण्यात आलेल्या सोबतच्या परिशिष्ट अ मध्ये नमुद मुद्यांवर संस्थेच्या झालेल्या आर्थिक नुकसानीची जबाबदारी संबधितांवर निश्चित करणेसाठी **सौ. अर्चना एम. सौंदाणे, सहाय्यक निबंधक (१), अधिन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था नाशिक** यांची प्राधिकृत चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे.

प्राधिकृत चौकशी अधिकारी यांनी प्रस्तुतच्या आदेशासोबत जोडलेल्या परिशिष्ट अ मधील मुद्यांचे अनुषंगाने नमुद केलेल्या व्यवहारामध्ये संस्थेस झालेल्या आर्थिक नुकसानीचे संबधीत व्यक्तीनिहाय प्रमाण निश्चित करुन, जबाबदारी निश्चित करण्यासाठी योग्य ती कायदेशीर कार्यपद्धती अवलंबवावी व जबाबदारी निश्चित करावी. तसेच संस्थेस झालेल्या आर्थिक नुकसानीचे भरपाईबाबत आवश्यक ते आदेश करावेत.

प्राधिकृत चौकशी अधिकारी यांनी सदरची चौकशी या आदेशाच्या तारखेपासून **6 (सहा)** महिन्याचे आंत पूर्ण करावी व नुकसान भरपाईबाबतचे आदेश तीन प्रतीत या कार्यालयास सादर करावेत. प्राधिकृत चौकशी अधिकारी यांचे मेहनतानाचे आदेश अलाहिदा पारित करण्यात येतील.

सदरचा आदेश आज दिनांक 27/11/2017 रोजी माझ्या सहीनिशी व कार्यालयीन मुद्रा ठसवून दिला आहे.

ठिकाण : सिन्नर.
दिनांक : 27/11/2017

सही/-
( अर्चना सौंदाणे )
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, सिन्नर, जि.नाशिक.

प्रति :-

1) चेअरमन/सचिव, गुळवंच विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., गुळवंच ता. सिन्नर, जि. नाशिक.
   2/- त्यांना कळविणेत यते की, त्यांनी चौकशी अधिकारी यांना चौकशीकामी आवश्यक असणारे सर्व दप्तर उपलब्ध करुन देऊन आवश्यक ते सर्व सहकार्य करावे.
2) सौ. अर्चना एम. सौंदाणे, प्राधिकृत चौकशी अधिकारी, तथा सहाय्यक निबंधक (१), अधिन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था नाशिक नाशिक
3) चेअरमन / कार्यकारी संचालक, नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., नाशिक.
4) लेखापरिक्षक श्रेणी-1, सहकारी संस्था, सिन्नर
5) विभागीय अधिकारी, नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., नाशिक, (सिन्नर मार्केट यार्ड).
6) श्री. पी. जी. वरखेडे लेखापरिक्षक श्रेणी-1, सहकारी संस्था, सिन्नर.

<u>प्रत माहितीस्तव सविनय सादर :-</u>

5) मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक.
6) मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक.
7) जिल्हा विशेष लेखापरिक्षक (वर्ग-1), सहकारी संस्था, नाशिक.

सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, सिन्नर, जि.नाशिक.

# परिशिष्ट-अ

**संस्थेचे नांव :- गुळवंच विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या.,गुळवंच ता. सिन्नर,जि.नाशिक.**

**1) सचिव येणे खाती नांवे टाकून रोख शिल्लक रक्कमेचा अपहार रु. 19,95,532/- :-**

संस्थेचे सचिव म्हणून कार्यरत असतांना तत्कालिन सचिव श्री. विजय भानुदास ताजणे यांनी विशेष अहवालात नमुद केले प्रमाणे दिनांक 6/4/2015 ते 4/4/2016 पर्यंत वेगवेगळ्या दिनांकास सभासद कर्जदार यांनी भरणा केलेल्या रकमांचा भरणा त्याच दिवशी अथवा त्यानंतरच्या बँक कामकाजाच्या दिनांकास बँकेत भरणा करणे आवश्यक असतांना तसे न करता कर्जदार सभासदांकडून रोख रक्कम स्विकारुन ती ववेळीच बँकेत भरणा न करता अधिकाराचा गैरवापर करुन रोख शिल्लक हातावर ठेवून पुढे दिनांक 4/4/2016 रोजी सचिव येणे खाती नांवे टाकून शिल्लक घटवून संस्था व संस्थेचे सभासद यांचा विश्वासघात करुन रोख शिल्लक रकमेचा अपहार केलेला आहे. (सविस्तर तपशिलास्तव विशेष अहवालाची मुळ प्रत माहितीस्तव सोबत जोडण्यात येत आहे)

**२) शिल्लक फरक रु. 42,142/-**

दिनांक 31/03/2017 अखेर तपासणीस सादर केलेल्या व्हाऊचर नुसार शिल्लक फरक रु. 42,142/- येणे दर्शविलेला असुन तो तत्कालीन सचिव यांचे नांव ताळेबंदास सचिव येणे दर्शविला आहे. सदर रक्कम ही रोख शिल्लक अपहाराची असून रक्कमेचा सचिव श्री. विजय भानुदास ताजणे यांनी अपहार केलेला आहे.

सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, सिन्नर, जि. नाशिक.